रे.मु.नं.६५/२००७
बशीर वि. रमेशलाल व इतर

## आदेश नि.क्र.१३१

सदर अर्ज प्रतिवादीतर्फे त्यांचे विरोधात झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करणेसाठी आहे.

२. अर्ज, म्हणणे, व कादपत्राचे अवलोकन केले.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. अर्जदार प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी २(अ) यास हजर करणेकामी दावा तजवीज साठी आहे. गुरूवारची तारीख देण्यात आली होती. गुरूवारी विधिज्ञ बाहेरगावी असतात. त्यामुळे तजवीज करता आली नाही.

५. समोरिल बाजूचे थोडक्यात कथन असे की, अर्ज बेकायदेशीर आहे. लांबणीवर टाकणेकामी आहे. कोणताही प्रतिवादी हजर नव्हता, शेवटी अर्ज रद्द करण्याची व पर्यायाने खर्चाची विनंती केली.

६. प्रतिवादी २ चा वारस दाव्यात नि.क्र.१०५ ला हजार झालेला आहे व नि.क्र.१०६ वर कैफियत दिलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये समोरील प्रकरण पाहता खर्चावर अर्ज मंजूर करणे न्याय व योग्य दिसुन येते, करिता खालील आदेश.

## आदेश

अर्ज समोरील बाजूस रू.१००/— (रूपये शंभर मात्र) खर्च देण्यावर मंजूर करण्यात येतो.

सही/—
(श.गि.दुबाले)
दि.न्या.क.स्तर, नांदगाव.

दि. १०/१२/२०१९